जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत कामांसंदर्भात जिल्हा नियोजन समितीने विनंती केल्यास जिल्हा परिषदेने "ना-हरकत प्रमाणपत्र" देणेबाबत....

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय क्र. डिएपी- १०१४/प्र.क्र. २९५/का.१४८१,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १६ ऑक्टोबर, २०१७.

वाचा : (१) महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) अधिनियम, १९९८.

(२) महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (सभा घेणे) नियम, १९९९

(३) नियोजन विभाग, शासन निर्णय, क्र. जिवायो- १००७/ प्र.क्र. ३९/का.१४४४, दिनांक १६ फेब्रुवारी,२००८.

(४) नियोजन विभाग शासन निर्णय, क्र. डिएपी-१०१४/ प्र.क्र. २९५/ का. १४८१, दिनांक १७ डिसेंबर, २०१४.

(५) ग्राम विकास विभाग, शासन निर्णय, क्र.जिवायो २०१५/ प्र.क्र.१९१/ पंरा-८, दिनांक ०३ सप्टेंबर, २०१६.

प्रस्तावना:

महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) अधिनियम, १९९८ मधील कलम-१० मध्ये जिल्हा नियोजन समितीची कामे विहित केली आहेत. त्यानुसार जिल्हा नियोजन समितीने कामकाज पार पाडणे अपेक्षित आहे. जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था व अन्य कार्यान्वयीन यंत्रणांनी तयार केलेल्या जिल्हा वार्षिक योजना विचारात घेऊन, संपूर्ण जिल्ह्याच्या विकास योजनेचा एकत्रित मसुदा तयार करुन तो राज्य शासनास सादर करण्याच्या उद्देशाने जिल्हा नियोजन समितीची स्थापना करण्यात आली आहे.

२. महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) अधिनियम, १९९८ मधील कलम-७ च्या तरतुदींच्या अनुषंगाने जिल्हा वार्षिक योजनेचा निधी अर्थसंकल्पित करणे, वितरीत करणे व या निधीतील कामांना प्रशासकीय मान्यता देणेबाबतची सुधारित कार्यपध्दती शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र. जिवायो-१००७/ प्र.क्र.३९/ का.१४४४, दिनांक १६ फेब्रुवारी, २००८ अन्वये विहीत करण्यात आली आहे.

३. मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्र. १६९८/२०११ (श्री.चरणसिंह वाघमारे विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर) या प्रकरणी दिलेल्या न्याय निर्णयाच्या अनुषंगाने तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर येथे दाखल झालेल्या रिट

याचिका क्र. ४८३१/२०१३ (श्री. सुधीर सुर्यवंशी विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर) या प्रकरणी दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र. डिएपी-१०१४/ प्र.क्र.२९५/ का.१४८१, दिनांक १७ डिसेंबर, २०१४ निर्गमित करण्यात आला. तसेच, मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, नागपूर येथे दाखल रिट याचिका क्र. १२२८/२०१३ (श्री.सुधीर राजाराम राऊत विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर) मध्ये मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक ०७ एप्रिल, २०१५ च्या आदेशात शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र. डिएपी-१०१४/प्र.क्र.२९५/का.१४८१, दिनांक १७ डिसेंबर, २०१४ अन्वये विहित करण्यात आलेली व्यवस्था योग्य असल्याचे निरीक्षण नोंदविले आहे. या शासन निर्णयान्वये स्थानिक स्वराज्य संस्थेकडील कामांबाबत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने "ना-हरकत प्रमाणपत्र" दिल्यास अशा कामांची राज्यस्तरीय कार्यान्वयीन यंत्रणेकडून अंमलबजावणी करुन घेता येईल. मात्र, कोणत्याही परिस्थितीत स्थानिक स्वराज्य संस्थेचे "ना-हरकत" प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थेकडील कामांची राज्यस्तरीय यंत्रणेकडून अंमलबजावणी करता येणार नाही, असे निर्देशीत करण्यात आले आहे.

४. जिल्हा नियोजन समितीस उपलबध होणाऱ्या निधीपैकी विविध लोकोपयोगी विकास कामांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होतो. सदर निधी त्याच वर्षात खर्च करणे अपेक्षित आहे. तथापि, स्थानिक स्वराज्य संस्थांना एखाद्या आर्थिक वर्षात वितरीत केलेला निधी खर्च करण्यास येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन शासनाने सदर निधी लगतच्या पुढील वर्षात खर्च करण्यास अनुमती दिली आहे. असे असूनही स्थानिक स्वराज्य संस्थांकडील निधी मोठ्या प्रमाणावर अखर्चित राहतो. त्याचप्रमाणे संदर्भ क्र. ४ येथील शासन निर्णयामधील अ.क्र. (६) मधील तरतूदीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांकडील ज्या कामांची अंमलबजावणी राज्यस्तरीय यंत्रणेकडून करावयाची आहेत अशा कामांना स्थानिक स्वराज्य संस्थांकडून व त्यातही विशेषत्वाने जिल्हा परिषदांकडून जिल्हा नियोजन समितीस "ना-हरकत प्रमाणपत्र" वेळेत प्राप्त न झाल्यामुळे मोठ्या प्रमाणावर निधी अखर्चित राहतो व परिणामी जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत मोठ्या प्रमाणात लोकोपयोगी विकास कामे प्रलंबित राहतात.

५. महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) अधिनियम, १९९८ मधील कलम-१२ अन्वये राज्य शासनास जिल्हा नियोजन समितीच्या कामासंबंधातील मार्गदर्शक तत्वे किंवा त्यांनी स्विकृत केलेले ठराव, राज्य शासनाला समित्यांच्या सहकार्याने करणे योग्य वाटेल अशी कोणतीही बाब यांच्यासंबंधात जिल्हा नियोजन समित्यांना निर्देश देण्यात येतील, या तरतूदीच्या अधिन राहून जिल्हा नियोजन समितीकडून मंजूरी/ "ना-हरकत प्रमाणपत्र" मिळण्याची विनंती जिल्हा परिषदेस

प्राप्त झाल्यास त्यावर निर्णय घेण्यासाठी कालमर्यादा ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय:</u>

शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र. डिएपी-१०१४/प्र.क्र.२९५/का.१४८१, दिनांक १७ डिसेंबर, २०१४ च्या अनुक्रमांक ४ व ६ मधील तरतूदी संदर्भात जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत विविध कार्यक्रम/ योजनांच्या संबंधित कामांची अंमलबजावणी होण्याकरीता जिल्हा परिषदेकडून मंजूरी/ "ना-हरकत प्रमाणपत्र" देण्यासाठी कालमर्यादा व कार्यपध्दती खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

अ) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) च्या प्रारुप आराखड्यासोबत विविध कार्यक्रम/ योजनांतर्गत करावयाच्या कामांच्या याद्या असणे बंधनकारक आहे. प्रारुप आराखडा तयार करताना जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत योजनेतील अशा कामांसाठी जिल्ह्यातील कार्यान्वयीन यंत्रणांकडून मागविलेल्या प्रस्तावांमध्ये जिल्हा परिषदेकडील कामांच्या याद्या प्राप्त न झाल्यास त्या ऐवजी राज्य स्तरीय कार्यान्वयीन यंत्रणेकडील त्या कार्यक्रम/ योजने अंतर्गत कामांच्या याद्यांसह प्राप्त झालेला प्रस्ताव जिल्हा परिषदेच्या मान्यतेसाठी पाठवून "ना-हरकत प्रमाणपत्र" देण्याबाबत मागणी करण्यात येईल.

आ) जिल्हा परिषदेकडील जी काही विशिष्ट/ महत्त्वाची कामे जिल्हा परिषदेऐवजी राज्य स्तरीय कार्यान्वयीन यंत्रणेकडून करुन घेणे आवश्यक असल्याचे जिल्हा नियोजन समितीचे मत झाल्यास त्यासाठी जिल्हा नियोजन समितीकडून संबंधित जिल्हा परिषदेकडे "ना-हरकत प्रमाणपत्र" देण्याची मागणी करण्यात येईल.

इ) जिल्हा नियोजन समितीकडून वरील (अ) व (आ) बाबतच्या "ना-हरकत प्रमाणपत्र" मागणीचा प्रस्ताव जिल्हा परिषदेस प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून २१ दिवसानंतर होणाऱ्या जिल्हा परिषदेच्या पहिल्या सर्वसाधारण सभेमध्ये ते विचारार्थ ठेवण्यात येतील व त्यावर निर्णय घेण्यात येईल. जिल्हा नियोजन समितीकडून प्राप्त प्रस्ताव नाकारण्याचा अथवा स्विकारण्याचा अधिकार जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेस असेल.

जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत घेण्यात आलेला निर्णय सर्वसाधारण सभा संपन्न झाल्यापासून ७ दिवसात जिल्हा नियोजन समितीस कळविण्यात येईल. सर्वसाधारण सभा संपन्न झाल्यापासून ७ दिवसाच्या कालावधीत जिल्हा परिषदेकडून "ना-हरकत प्रमाणपत्रा" संदर्भात झालेला निर्णय जिल्हा नियोजन समितीला कळविण्यात न आल्यास जिल्हा नियोजन समितीने केलेल्या मागणीबाबत जिल्हा परिषदेची हरकत नाही, असे समजण्यात येईल व जिल्हा नियोजन समितीस यथास्थिती उपरोक्त नमूद (अ) संदर्भात,

जिल्हा नियोजन समितीकडून प्रस्तावित राज्य स्तरीय कार्यान्वयीन यंत्रणेकडील कामांना मान्यता असल्याचे समजले जाईल व (आ) बाबत सदर कामे राज्य स्तरीय कार्यान्वयीन यंत्रणेकडून करुन घेता येतील.

२. हा शासन निर्णय **ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या** सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१७१०१६१७४२०४१२१६ असा आहे. तसेच, हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Dattatraya Joshi

Digitally signed by Anil Dattatraya Joshi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d7de9577f1b6301ba91e582c9402233953565e9fd17971ff1b7a2b8a94cf42c6, cn=Anil Dattatraya Joshi
Date: 2017.10.16 17:30:40 +05'30'

(अ.द.जोशी)
उप सचिव, नियोजन विभाग

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री यांचे सचिवालय, मंत्रालय मुंबई-३२
३. मा. मंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव,
४. मा. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६. सर्व पालक सचिव.
७. सर्व विभागीय आयुक्त
८. जिल्हाधिकारी व सदस्य सचिव (सर्व), जिल्हा नियोजन समिती (सर्व जिल्हे).
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
१०. उप आयुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व विभाग).
११. जिल्हा नियोजन अधिकारी (सर्व), जिल्हा नियोजन समिती (सर्व जिल्हे).
१२. सर्व सहसचिव / उपसचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई. ३२.
१३. कक्ष अधिकारी, का. १४८१-अ, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१४. निवड नस्ती, का. १४८१.